विशेष-अ.जा./मुं. सा. वि./५० म.

965

क्रमांक ~~030~~

सत्यमेव जयते

# नोंदणी प्रमाणपत्र

**संस्था नोंदणी अधिनियम, १८६०**

**(१८६० चा अधिनियम २१)**

नोंदणी क्रमांक महाराष्ट्र/१८२८६/कोल्हापूर

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, स. का. खाडे महाविद्यालय, कोपार्डे अलूमनी असोसिएशन, कोपार्डे, ता. करवीर, जि. कोल्हापूर

खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्यरीत्या नोंदणी करण्यात आली.

तारीख १२/१/२००४ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

ASSISTANT REGISTRAR OF SOCIETIES
सहाय्यक संस्था निबंधक,
कोल्हापूर क्षेत्र
KOLHAPUR AREA

सहाय्यक संस्था निबंधक
कोल्हापूर क्षेत्र विभाग.

Scanned with CamScanner

परिशिष्ट – अ

दिनांक :– २३/१२/२००३

प्रति,

माननीय सहाय्यक संस्था निबंधकसो,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

विषय :– संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणीबाबत.
"स. ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे अलूमनी
असोसिएशन, ता. करवीर, जि. कोल्हापूर"

महोदय,

निवेदन करण्यात येते कीं, विषयांत नमूद केलेल्या संस्थेची नोंदणी संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये करावयाची आहे. सबब आपणांकडे खालीलप्रमाणे कागदपत्र सादर करण्यात येत आहेत.

१) विधानपत्र (ज्ञापन) (मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन).
२) नियम व नियमांवलीची सत्य प्रत.

३) संस्था नोंदणी संदर्भात कार्यकारी मंडळाचे सर्व सभासदांचे समंतीपत्र.

४) संस्था नोंदणी बाबत कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांच्या सहिनिशी अधिकार पत्र.

५) संस्थेच्या पत्याबाबत व मालमत्तेबाबत अध्यक्ष वा सेक्रेटरी यांचे प्रतिज्ञापत्र रू. २०/– (रूपये वीस) च्या स्टॅम्प पेपरवर रू. १०/–च्या कोर्ट फी स्टॅम्पसह.

पुढे असेही निवेदन करण्यात येते कीं, वरील संस्थेचे सर्व उद्देश सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमांच्या कलम २० अन्वये असून वरील संस्थेच्या नांवाची किंवा नामसादृश्य असलेली अन्य संस्था माझे माहितीप्रमाणे अस्तित्वांत वा नोंद झालेली नाही. नोंदणी शुल्क रू. ५०/– ( रूपये पन्नास) भरण्यास तयार आहे. तरी वरील संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये त्वरीत नोंदवावी अशी विनंती आहे.

कळावे,

आपला

Patil

श्री. विश्वास राऊ पाटील,
रा. घ नं. कोपार्डे
ता. करवीर, जि. कोल्हापूर

सहपत्रे : वरीलप्रमाणे

Scanned with CamScanner

परिशिष्ट – अ

दिनांक :– 23/12/२००३

प्रति,

माननीय सहाय्यक संस्था निबंधकसो,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

विषय :– संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणीबाबत.
"स.ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे अलूमनी
असोसिएशन, ता. करवीर, जि. कोल्हापूर"

महोदय,

निवेदन करण्यात येते कीं, विषयांत नमूद केलेल्या संस्थेची नोंदणी संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये करावयाची आहे. सबब आपणांकडे खालीलप्रमाणे कागदपत्र सादर करण्यात येत आहेत.

१) विधानपत्र (ज्ञापन) (मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन).
२) नियम व नियमांवलीची सत्य प्रत.
३) संस्था नोंदणी संदर्भात कार्यकारी मंडळाचे सर्व सभासदांचे समंतीपत्र.
४) संस्था नोंदणी बाबत कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांच्या सहिनिशी अधिकार पत्र.
५) संस्थेच्या पत्याबाबत व मालमत्तेबाबत अध्यक्ष वा सेक्रेटरी यांचे प्रतिज्ञापत्र रू. २०/– (रूपये वीस) च्या स्टॅम्प पेपरवर रू.१०/–च्या कोर्ट फी स्टॅम्पसह.

पुढे असेही निवेदन करण्यात येते कीं, वरील संस्थेचे सर्व उद्देश सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमांच्या कलम २० अन्वये असून वरील संस्थेच्या नांवाची किंवा नामसादृश्य असलेली अन्य संस्था माझे माहितीप्रमाणे अस्तित्वांत वा नोंद झालेली नाही. नोंदणी शुल्क रू .५०/– ( रूपये पन्नास) भरण्यास तयार आहे. तरी वरील संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये त्वरीत नोंदवावी अशी विनंती आहे.

कळावे,

आपला

Patil

श्री. विश्वास राऊ पाटील,
रा. घ नं. कोपार्डे
ता. करवीर, जि. कोल्हापूर

सहपत्रे : वरीलप्रमाणे

Scanned with CamScanner

/// परिशिष्ट – ब ///

"स. ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे अलूमनी ------, असोसिएशन,
ता. करवीर, जि. कोल्हापूर "

या संस्थेचें

/// ज्ञा प न ///

(मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन)

१) संस्थेचे नांव :– "स. ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे अलूमनी
असोसिएशन, ता. करवीर, जि. कोल्हापूर "

२) संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता ) श्री. विश्वास राऊ पाटील, अध्यक्ष,
) "स. ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे अलूमनी
) असोसिएशन, ता. करवीर, जि. कोल्हापूर "
)
)

३) संस्थेचे उद्देश :–

(१) अतिदुर्गम भागात उच्च शिक्षणाचा प्रसार करणे.

(२) ग्रामस्वच्छता. आरोग्य शिबीरे, रक्तदान शिबीर, साक्षरता अभियान, एड्स, व्यसनमुक्ती आदीबाबत जनजागृती करणे

(३) गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करणे.

(४) महाविद्यालयाचे शैक्षणिक कार्य समृध्द करण्यासाठी मदत करणे.

(५) महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांना नैसर्गिक आपत्तीप्रसंगी वैद्यकीय मदत करणे.

(६) माजी विद्यार्थ्यांचा परस्परांशी संपर्क असावा यासाठी वेळोवेळी व ठिकठिकाणी त्यांचे मेळावे आयोजित करणे.

| | | | |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | खजानीस | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

Scanned with CamScanner

९१३

४) "स.ब.खाडे महाविद्यालय,कोपार्डे अलूमनी असोसिएशन, ता.करवीर,जि.कोल्हापूर" संस्थेच्या नियम व नियमांवली नुसार या संस्थेची व्यवस्था ज्या पहिल्या कार्यकारी मंडळ सदस्यांवर सोपविणेत आलेली आहे अशा या संस्थेच्या पहिल्या कार्यकारी मंडळ सदस्यांची नांवे,पत्ते, हुद्दा,वय, व्यवसाय, राष्ट्रीयत्व ईत्यादी तपशिल पुढीलप्रमाणे.

| अ.नं. सदस्यांचे संपूर्ण नांव व पत्ता | हुद्दा | वय | राष्ट्रीयत्व | व्यवसाय |
|---|---|---|---|---|
| १) श्री.विश्वास राऊ पाटील<br>रा.घर नं. कोपार्डे,ता.करवीर,जि.कोल्हापूर | –अध्यक्ष | ३० | भारतीय | शिक्षक |
| २) श्री.विष्णू ज्ञानू राऊत<br>रा.घर नं. कुडीत्रे,ता.करवीर, | –उपाध्यक्ष | २८ | भारतीय | नोकरी |
| ३) श्री.श्रीकांत हरी पाटील<br>रा.घर नं. आसगांव,ता.पन्हाळा, | –सेक्रेटरी | २८ | भारतीय | शिक्षक |
| ४) श्री.इंद्रजित बळीराम शिरगांवकर<br>रा.घर नं. कोपार्डे,ता.करवीर, | –खजानीस | २३ | भारतीय | शिक्षण |
| ५) श्री.युवराज उर्फ संदिप मोहन पाटील<br>रा.घर नं. बाजार भोगांव,ता.पन्हाळा, | –सदस्य | २४ | भारतीय | शिक्षण |
| ६) श्री.बाबासाहेब बाळू पोवाळकर<br>रा.घर नं. दोनवडे,ता.करवीर, | –सदस्य | ३० | भारतीय | शिक्षक |
| ७) श्री.निशिकांत पांडूरंग खाडे<br>रा.घर नं. सांगरूळ,ता.करवीर, | –सदस्य | २७ | भारतीय | शेती |
| ८) प्रा.कु.विद्या श्रीपती पाटील<br>रा.घर नं. कळंबे,ता.करवीर, | –सदस्य | २६ | भारतीय | प्राध्यापिका |
| ९) कु.सविता श्रीपती भास्कर<br>रा.घर नं. कुडीत्रे,ता.करवीर, | –सदस्य | २४ | भारतीय | शिक्षण |

| सेक्रेटरी | खजानीस | उपाध्यक्ष | अध्यक्ष |
|---|---|---|---|

Scanned with CamScanner

975



४) आम्ही खालील सह्या करणारे, "स.ब.खाडे महाविद्यालय,कोपार्डे अलूमनी असोसिएशन, ता.करवीर,जि.कोल्हापूर"या संस्थेचे सदस्य जाहिर करतो की,संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वांत आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येवून, खालील सह्या करणारे, "स.ब.खाडे महाविद्यालय,कोपार्डे अलूमनी असोसिएशन, ता.करवीर, जि.कोल्हापूर" संस्था आज दिनांक २२/१०/२००३ इ. रोजी स्थापन केली असून ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

| अ.नं. सदस्यांचे संपूर्ण नांव व पत्ता | सह्या |
|---|---|
| १) श्री.विश्वास राऊ पाटील<br>रा.घर नं. कोपार्डे,ता.करवीर,जि.कोल्हापूर | (सही) |
| २) श्री.विष्णू ज्ञानू राऊत<br>रा.घर नं. कुडीत्रे,ता.करवीर, | (सही) |
| ३) श्री.श्रीकांत हरी पाटील<br>रा.घर नं. आसगांव,ता.पन्हाळा, | (सही) |
| ४) श्री.इंद्रजित बळीराम शिरगांवकर<br>रा.घर नं. कोपार्डे,ता.करवीर, | (सही) |
| ५) श्री.युवराज उर्फ संदिप मोहन पाटील<br>रा.घर नं. बाजार भोगांव,ता.पन्हाळा, | (सही) |
| ६) श्री.बाबासाहेब बाळू पोवाळकर<br>रा.घर नं. दोनवडे,ता.करवीर, | (सही) |
| ७) श्री.निशिकांत पांडूरंग खाडे<br>रा.घर नं. सांगरूळ,ता.करवीर, | (सही) |
| ८) प्रा.कु.विद्या श्रीपती पाटील<br>रा.घर नं. कळंबे,ता.करवीर, | (सही) |
| ९) कु.सविता श्रीपती भास्कर<br>रा.घर नं. कुडीत्रे,ता.करवीर, | (सही) |

स्थळ :-कोपार्डे,ता.करवीर,जि.कोल्हापूर

दिनांक :-२२/१०/२००३

वरील सह्या करणाऱ्या सर्व व्यक्तींना मी ओळखतो. त्यांनी माझ्या समक्ष वरील विधानपत्रावर सह्या केल्या आहेत. ता. २२/१०/२००३

JOHN S. BHUTELO
L. S. L. LL.B. (Spel.)
ADVOCATE & NOTARY
KOLHAPUR.

शिक्का
(वकील/सरकारी अधिकारी/नोटरी)

सही :-

नांव :-

पत्ता :-

Scanned with CamScanner

"स.ब.खाडे महाविद्यालय,कोपार्डे अलूम्नी असोसिएशन, ता.करवीर,जि.कोल्हापूर" १२१

या संस्थेची

## -:: नियम व नियमांवली ::-

१) नियमांवलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या :-

(१) संस्था / मंडळ :-

संस्था/मंडळ म्हणजे "स.ब.खाडे महाविद्यालय,कोपार्डे अलूम्नी असोसिएशन, ता.करवीर,जि.कोल्हापूर" ही संस्था/मंडळ होय

(२) सदस्य / सभासद :-

सदस्य / सभासद म्हणजे संस्थेकडे या महाविद्यालयातून पदवी घेतलेल्या व्यक्तीने संस्थेच्या सभासदत्वासाठी संस्थेच्या नियम व नियमांवलीनुसार सर्व अटींची पुर्तता करून संस्थेकडे अर्ज केल्यास संस्थेच्या कार्यकारी मंडळाने सदरचा अर्ज मंजूर केल्यास त्या व्यक्तीस या संस्थेचा सदस्य / सभासद असे म्हटले जाईल.

(३) कार्यकारी मंडळ :-

कार्यकारी मंडळ म्हणजे संस्थेच्या सर्वसाधारण सभेने संस्थेचे दैनंदिन बाबींची व्यवस्था ठेवणेसाठी ठराविक कालावधीसाठी ज्यांचेवर जबाबदारी सोपविणेत आलेली आहे अशा ०९ (नऊ) सभासदांची समिती जिचा उल्लेख येथून पुढे कार्यकारी मंडळ असा केला जाईल.

(४) सभा :-

सभा म्हणजे संस्थेचे उद्देश पार पाडणेसाठी संस्थेच्या सभासदांशी विचारविनिमय करून निर्णय घेणेसाठी बोलाविण्यात आलेली बैठक होय.

२) कार्यक्षेत्र :-महाराष्ट्र.

| | | | |
|---|---|---|---|
| ............... | ............... | ............... | ............... |
| सेक्रेटरी | खजानीस | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

....२/-

Scanned with CamScanner

३) <u>हिशोबाचे वर्ष</u> :- १ एप्रिल ते ३१ मार्च असे हिशोबाचे वर्ष राहील.

४) <u>सभासदत्व व त्यांची नोंदणीची पध्दत</u> :-

संस्थेचे ध्येय ,धोरण व दृष्टीकोन मान्य असलेल्या व संस्थेची नियम व नियमावलीनुसार वागण्यास तयार असणाऱ्या या महाविद्यालयातून पदवी घेतलेल्या व्यक्तीस या संस्थेचा सभासद होता येईल. संस्थेची वार्षिक वर्गणी रू.६०/- (रू.साठ)इतकी राहील व प्रवेश फी रू.२०/-(रू.वीस) इतकी राहील. संस्थेचा सभासद होवू इच्छिणाऱ्या व्यक्तीने संस्थेने ठरविलेल्या नमुन्याच्या फॉर्ममध्ये माहिती भरून कार्यकारी मंडळातील दोन सभासदांच्या शिफारशीनुसार त्यांच्या सहयानिशी घेवून सदरचा अर्ज कार्यकारी मंडळाच्या सभेत २/३ ( दोन तृतिआंश ) मताने मंजूर झाल्यास त्या व्यक्तीस या संस्थेच्या सभासदत्वाचे सर्व हक्क प्राप्त होतील. संस्थेची वार्षिक सभासद वर्गणी न भरलेल्या सभासदांचे सभासदत्व रद्द करणेत येईल.

५) <u>सभासदांचे प्रकार</u> :-

(अ) <u>संस्थापक सभासद</u> :-

जे सभासद संस्था स्थापन करणेस कारणीभूत होतील तसेच त्यांना संस्थेने ठरवून दिलेली वार्षिक वर्गणी रू.६०/- (रू.साठ) नियमित भरली पाहिजे, अशा सभासदांना या संस्थेचे संस्थापक सभासद असे म्हटले जाईल.

(ब) <u>सामान्य सभासद</u> :-

जे सभासद संस्थेची वार्षिक वर्गणी रूपये ६०/- (रूपये साठ) वेळचेवेळी देतील अशा सभासदांना सामान्य सभासद असे म्हटले जाईल. वार्षिक वर्गणीच्या हया रक्कमेत बदल करणेचा अधिकार सर्वसाधारण सभेच्या अनुमतीने कार्यकारिणीस राहील. अशी जमा झालेली वर्गणी कोणत्याही परिस्थितीत परत दिली जाणार नाही.

(क) <u>आश्रयदाते सभासद</u> :-

जे सभासद संस्थेस रूपये ५००/- ( रूपये पांचशे ) देतील अशा सभासदांना या संस्थेचे आश्रयदाते सभासद असे म्हटले जाईल. अशा सभासदांना संस्थेची प्रवेश फी व वार्षिक वर्गणी यांची अट लागू रहाणार नाही. तसेच अशा सभासदांना संस्थेच्या कार्यकारी मंडळ निवडणूकीत भाग घेता येणार नाही.

(ड) <u>आजीव सभासद</u> :-

ज्या व्यक्तीस संस्थेस रूपये १,०००/- (रू.एक हजार) देईल अशा व्यक्तीस या संस्थेचा आजीव सभासद असे म्हटले जाईल.

| सेक्रेटरी | खजानीस | उपाध्यक्ष | अध्यक्ष |
|---|---|---|---|

६) <u>सभासदत्व रद्द करणे</u> :-

(अ) संस्थेचे नियम व नियमावलीतील तसेच संस्थेस विघातक कृत्ये करणा-या कोणाही सभासदांचे सभासदत्व कार्यकारी मंडळाच्या सभेत झालेल्या ठरावानुसार कांही मुदतीपुरते वा कायमचे रद्द करणेत येईल. तथापि त्यास वार्षिक सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणे आवश्यक आहे. याबाबत वार्षिक सर्वसाधारण सभेचा निर्णय अंतिम व निर्णायक राहील.

(ब) <u>सभासदांचे हक्क व बंधने</u> :-

१) संस्थेच्या उद्दीष्टपूर्तीच्या अनुषंगाने कोणतेही प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या बैठकीत लेखी अथवा तोंडी स्वरूपातून मांडण्याचा अधिकार सभासदास प्राप्त झालेला आहे.

२) सर्वसाधारण सभेच्या बैठकीत आपले विचार प्रकट करणेचे स्वातंत्र्य सभासदांस राहील.

३) कार्यकारी मंडळाच्या सदस्यांच्या निवडणूकीत मतदान करणे, नव्या प्रस्तावास अनुमती अथवा नकार देणे, उद्दीष्टपूर्तीसाठी नवे उपक्रम अथवा कार्यक्रम सुचविणे, कार्यकारी मंडळाच्या सभासदत्वासाठी उमेदवारी जाहिर करणे, कार्यकारी मंडळास सहकार्य देणे व संस्थेच्या उत्कर्षासाठी सतत प्रयत्न करणे ही मुलभूत कार्ये सभासदांना करावी लागतील.

४) संस्थेचे अध्यक्ष अथवा सेक्रेटरी यांच्या लेखी परवानगीने संस्थेने गुप्त म्हणून ठरविलेले रेकॉर्ड व्यतिरीक्त इतर रेकॉर्ड पहाणेचा अधिकार सभासदास आहे.

५) सभासदाने संस्थेच्या ध्येय, धोरण व दैनंदिन कामकाजाच्या गुप्त गोष्टींची कोठेही वाच्यता करणेची नाही.

६) संस्थेचे पदाधिकारी यांचेबाबत कांही गैरसमज, मतभेद निर्माण झाल्यास त्याबाबत प्रथमता अध्यक्ष नंतर कार्यकारी मंडळ व नंतर वार्षिक सभा यांचेपुढे मांडणेचे आहेत वा जेष्ठ सभासदास लवाद म्हणून नेमून त्यांचा निर्णय बंधनकारक मानणेचा आहे. अशा प्रसंगी पोलीस,वर्तमानपत्रे यांचेकडे जाणेचे नाही.

| सेक्रेटरी | खजानीस | उपाध्यक्ष | अध्यक्ष |
|---|---|---|---|



Scanned with CamScanner

७) <u>सर्वसाधारण सभा, तिचे अधिकार व कार्ये</u> :-

(अ) संस्थेची सर्वसाधारण सभा दरवर्षी संस्थेच्या हिशोबाचे वर्ष संपल्यापासून सहा महिन्याच्या आत बोलाविली पाहिजे. अशा वार्षिक सभेसाठी आवश्यक ते अहवाल,हिशोब तयार करून ठेवले पाहिजेत व ते सर्वसाधारण सभेपूढे मांडून सभेची मंजूरी घेतली पाहिजे.

(ब) संस्थेच्या उपयोगी पडतील अशा व्यक्तीस निमंत्रीत म्हणून कार्यकारी मंडळाच्या सभेत मंजूरी घेवून वार्षिक सभेत बोलाविता येईल, परंतू अशा व्यक्तींना मतदानात भाग घेता येणार नाही.

(क) सर्वसाधारणा सभा सुरू करणेपूर्वी सभेच्या अध्यक्षांनी सभेची गणपूर्ती ( कोरम ) पूर्ण झाली आहे याची स्वतः खात्री करणेची आहे. या सभेची नोटीस सर्व सभासदांना १५ दिवस आधी पाठवावी लागते. सर्व प्रथम या सभेच्या नोटीसीचे वाचन करून सदरची नोटीस सर्व सभासदांना पोहोचल्याबाबतची खात्री सभेच्या सदस्यांना करून दिली पाहिजे. अशा सभेस उपस्थित राहणाऱ्या सर्व सभासदांची नोंद ते या सभेस हजर असलेबाबत त्यांच्या सहयासहीत स्वतंत्र अशा हजेरी नोंद वहीत करणे जरूरीचे आहे. अशा सभेत सभासदांनी आपले मांडलेले विचारांची नोंद करून सभेत मांडलेले ठराव व मंजूर झालेले ठराव यांची नोंद वहीमध्ये (प्रोसिडींग बुकमध्ये) नोंद असणे जरूरीचे आहे. या नोंद वहीमधील मांडलेले ठराव व मंजूर झालेले ठराव सभासदांना प्रथमता कच्च्या स्वरूपात (ड्राफ्ट)त्याच मिटींगमध्ये वाचून दाखविणे व पुढील सर्वसाधारणा सभेमध्ये पक्क्या स्वरूपात केलेला सभा वृत्तांत परत एकवेळ जमलेल्या सभासदांना वाचून दाखवून उपसिथतांची मान्यता घेतल्यानंतर मागील सभा वृत्तांताच्या (प्रोसिडींग) शेवटी,''सभेचा वरील वृत्तांत वाचून दाखवला तो कायम करणेत येत आहे,'' असा मजकूर लिहून अध्यक्षांनी सही करून तारीख लिहीणेची आहे.

(ड) <u>वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील कामे</u> :-
कार्यकारी मंडळाची मुदत संपलेनंतर नवीन कार्यकारी मंडळ पदाधिकारी / सदस्य निवडणे, कार्गकारी मंडळाने सादर केलेला अहवाल, हिशोब इत्यादी मंजूर करणे, नियम नियमांवलीमध्ये दुरूस्ती करणे, संस्थेचे धोरण ठरविणे, सदस्यांनी अगोदर सुचना देवून सभेपुढील आणलेली कामे चालविणे इ.

८) <u>सर्वसाधारण सभेची सुचना (नोटीस) व गणसंख्या (कोरम)</u> :-

अ) वार्षिक सभेची सुचना (नोटीस) सभेच्या दिवसाच्या अगोदर १५ (पंधरा) दिवस दिली पाहिजे. अशी नोटीस पोहचलेबाबत त्यांच्या सहया स्वतंत्र रजिस्टरमध्ये घेणेच्या

| | | | |
|---|---|---|---|
| ............ | ............ | ............ | ............ |
| सेक्रेटरी | खजानीस | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

आहेत. एखादया सभासदास सभेची नोटीस पोस्टाने अगर हॅन्ड डिलीव्हरीने पाठवून देखील त्यास ती मिळाली नसल्यास सभेत मंजूर झालेल्या कामकाजात बाधा येणार नाही.

ब) सभेची गणसंख्या (कोरम) पटावरील सभासदांपैकी २५ ( पंचवीस ) अगर पटावरील सभासदांच्या ३/५ ( तीन पंचमांश) यापैकी जी संख्या कमी असेल ती राहील. गणसंख्या अभावी स्थगित झालेली सभा अध्यक्षांनी अर्ध्या तासात सभेच्या त्याच ठिकाणी परत बोलाविली पाहिजे. अशा सभेस गणसंख्येचे बंधन रहाणार नाही. अशा स्वरूपाचा स्पष्ट उल्लेख सभेच्या सुचनेमध्ये नमूद असणे जरूरीचे आहे.

९) <u>विशेष सर्वसाधारण सभा व तिची कार्ये</u> :-

अ) कार्यकारिणीने सर्व सभासदांपूढे एखादी महत्त्वाची गोष्ट ठेवायची असा निर्णय घेतल्यास तशा विशेष प्रसंगी सर्वसाधारण सभा बोलाविता येईल. सर्वसाधारण सभेची गणसंख्येव्यतिरीक्त इतर सर्व नियम पाळले जातील.

ब) पटावरील सभासद संख्येच्या १/४ (एक चतुर्थांश) सभासदांनी सभेची लेखी मागणी केल्यास व तशा सभेची आवश्यकता आहे, अशी खात्री वाटल्यास कार्यकारी मंडळ सभासदांची सभा बोलावून त्यात निर्णय घेवून अशी जादा सर्वसाधारण सभा अध्यक्षांनी विनाविलंब बोलाविली पाहिजे.

१०) <u>संस्थेचे कार्यकारी मंडळ, पदाधिकारी यांची रचना</u> :-

(१) संस्थेचे एकूण ९ सभासदांचे कार्यकारी मंडळ राहील. त्यांत अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी, खजानीस असे चार पदाधिकारी व बाकीचे कार्यकारी सदस्य रहातील.

(२) आवश्यक वाटल्यास कार्यकारी मंडळाच्या सभासदांची व्याप्ती ११ पर्यन्त वाढविणेचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

(३) कार्यकारिणी मंडळाच्या सर्व सभासदांची यादी सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमांच्या कलंम ४ व सन १९७१ च्या नियमांतील नोंदणी अधिनियमांच्या तरतूदीनुसार न्यास नोंदणी कार्यालय यांचेकडे अनुसूची १ च्या नमुन्यात पाठविणेत येईल. अनुसूची १ चा नमूना या नियम व नियमांवलीसोबत जोडला आहे.

(४) संस्थेच्या कार्यकारी मंडळात जरूरी भासलेस सल्लागार मंडळाची नियुक्ती करता येईल.

सेक्रेटरी | खजानीस | उपाध्यक्ष | अध्यक्ष

....६/-

Scanned with CamScanner

(५) कार्यकारी मंडळास व्यवस्थापनासाठी आवश्यकता वाटलेस कार्यकारी मंडळ/पदाधिकारी/सदस्य व संस्थेचे इतर सदस्य यांची एक किंवा अनेक पोटसमित्या नेमता येतील. या समित्यामधील रिकामी जागा कार्यकारी मंडळाने बहुमताने भरणेची आहे.

(६) कार्यकारी मंडळातील कोणाही पदाधिकारी वा सदस्य यांचा संस्थेने चालविलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभांना योग्य लेखी कारण न देता सतत तीन सभेना गैरहजर राहिले तर त्याचे कार्यकारी मंडळातील सदस्यत्व/पद आपोआप रद्द करणेत येईल. सदर सभासदास याबाबत नोटीस देणेची आवश्यकता नाही.

११) <u>कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ व निवडणूकीची पध्दत</u> :-

(१) कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ हा ५ (पाच) वर्षाचा असेल व त्या कार्यकारी मंडळाची निवडणूक दर पाच वर्षांनी वार्षिक सर्वसाधारणा सभेत बहुमताने केली जाईल.

(२) वार्षिक सर्वसाधारण सभेत ज्यावेळी कार्यकारी मंडळ पदाधिकारी व सदस्य यांची निवड करणेची आहे. त्यावेळी ती आवाजी मताने बहुमताने करणेची असून ती जमलेल्या सभासदांनी हात वर करून अध्यक्षांनी स्वतः उपस्थित सदस्यांच्या समोर मतमोजणी करून अध्यक्षांनी स्वतः खात्री करून निवड जाहिर करणेची आहे व ती निवड सर्वांवर बंधनकारक असेल.

१२) <u>कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे</u> :-

कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी व खजानीस असे रहातील, त्यांची कामे पुढीलप्रमाणे :-

<u>अध्यक्ष</u> :-

(१) संस्थेच्या एकूण कामकाजावर नियमितपणे नियंत्रण व देखरेख ठेवणे.
(२) संस्थेच्या कागदपत्रांवर सहया करणे, दैनंदिन कामाच्या अनुषंगाने येणारी कामे पहाणे,
(३) वार्षिक सभा, सर्वसाधारणा सभा, कार्यकारिणी सभा या सभांचे पदसिध्द अध्यक्षपद स्विकारून सभा निपक्षपणे पार पाडणे.
(४) समान मत विभागणी झाल्यास निर्णायक मत देणे.
(५) संस्थेचे सेक्रेटरी यांनी संस्थेचे कामकाज सुरळीतपणे पार पाडले नाहीतर स्वतःचे अधिकारात कार्यकारिणीची अगर वार्षिक सभा बोलावून त्यांत सेक्रेटरी विषयी निर्णय घेणे.

............ सेक्रेटरी ............ खजानीस ............ उपाध्यक्ष ............ अध्यक्ष



Scanned with CamScanner

<u>उपाध्यक्ष</u> :-

(१) अध्यक्षांच्या गैरहजेरीत अध्यक्षांची सर्व ती कामे करणे व संस्थेच्या सर्व कामांत त्यांना सहाय्य करणे.

(२) संस्थेस जरूरी वाटल्यास पोटसमित्यावर अध्यक्षपद स्विकारून संस्थेच्या कार्यात गती आणणे.

<u>सेक्रेटरी</u> :-

(१) संस्थेच्या ध्येय धोरणानुसार कार्यकारिणीच्या सुचनेप्रमाणे मंडळाचे दैनंदिन कामकाज पहाणे .

(२) वेळच्यावेळी कार्यकारिणी मंडळाच्या सभा अध्यक्षांच्या सल्ल्याने बोलाविणे व त्याचा वृत्तांत ठेवणे.

(३) कार्यकारिणी मंडळ व नोकर वर्ग यांचा दुवा म्हणून संबंध ठेवणे व त्यांच्या दैनंदिन कामकाजावर देखरेख ठेवणे.

(४) संस्थेसाठी पत्रव्यवहार करणे व दप्तर सांभाळणे.

(५) मान्यताप्राप्त बॅन्केत संस्थेसाठी जमा होणारी रक्कम भरणे व त्या अनुषंगाने येणारी कामे पहाणे, सेक्रेटरी यांना दैनंदिन खर्चासाठी रूपये १००/- (शंभर) इतकी रक्कम ठेवता येईल व मान्य असा खर्च रूपये ५०/- (पन्नास) अध्यक्षांच्या सल्ल्याने करता येईल. पण अशा खर्चास पहिल्याप्रथम नंतर होणाऱ्या कार्यकारिणीची मंजूरी घेणेत येईल.

<u>खजानीस</u> :-

(१) संस्थेसाठी लागणाऱ्या वहया, पावती पुस्तके, व्हौचर्स इ. ठेवणे.

(२) संस्थेचा हिशोब ठेवणे.

१३) <u>कार्यकारिणी मंडळाची सभा व मागणीची सभा</u> :-

कार्यकारिणी मंडळाची सभा दोन महिन्यातून एकदातरी बोलाविली पाहिजे. विशेष प्रसंगी एखाद्या महत्त्वाच्या तातडीच्या कामासाठी निर्णय घेणे आवश्यक वाटल्यास वेळेच्या अभावी सेक्रेटरी वा अध्यक्ष यांच्या परवानगीने कार्यकारी मंडळ सदस्यांकडे लेखी मत मागविले जाईल व त्या मताधिक्यावरून तो ठराव संम्मत वा असंम्मत झाला असे समजून त्यास मंजूरी घेणेत येईल.

सेक्रेटरी | खजानीस | उपाध्यक्ष | अध्यक्ष

....८/-

Scanned with CamScanner

१४) <u>कार्यकारिणी मंडळाच्या सभेची सुचना व गणसंख्या</u> :-

(१) कार्यकारी मंडळ सभेची सुचना सभेच्या दिवसापूर्वी निदान ४ ( चार ) दिवस अगोदर पाठविली पाहिजे.

(२) कार्यकारिणीच्या सभेत ३/४ (तीन चतुर्थांश) ची गणसंख्या ( कोरम ) असावी. तसेच कोरम अभावी तहकूब झालेली सभा अर्ध्या तासाने त्याचवेळी त्याच ठिकाणी घेणेत येईल. तशी सुचना सभेच्या नोटीशीमध्ये (सुचना) असणे जरूरीचे आहे.

१५) <u>कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत</u> :-

कार्यकारी मंडळातील एखादी जागा रिकामी झाल्यास ती कार्यकारी मंडळातील इतर सदस्यांनी बहुमताने भरणेची आहे.

१६) <u>कार्यकारी मंडळाच्या निवडणूकीचे नियम</u> :-

या नियम व नियमांवलीतील कलम ११ अन्वये संस्थेच्या कार्यकारी मंडळाची निवड दर ५ (पांच) वर्षानी सर्वसाधारण सभेत बहुमताने केली जाईल. कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांची यादी सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमांनुसार न्यास नोंदणी कार्यालय यांचेकडे अनुसूची २ प्रमाणे पाठविणेत येईल. अनुसूची २ चा नमुना या नियम व नियमांवलीसोबत जोडला आहे.

१७) <u>कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये</u> :-

अ) <u>संयुक्त सभा</u> :- सर्वसाधारण सभेमध्ये कार्यकारी मंडळाची बहुमताने निवड करणेत आले दिवसानंतर ८ ( आठ ) दिवसांमध्ये जुन्या ( मावळत्या ) व नव्या पदाधिकाऱ्यांची / सदस्यांची एकत्रीत संयुक्त सभा संस्थेच्या मावळत्या अध्यक्षांनी बोलाविणेची आहे व त्या सभेस मावळत्या अध्यक्षांनी नुतन अध्यक्षांना संस्थेच्या व्यवस्थापनाचा म्हणजे संस्थेचे दप्तर, कागदपत्र, स्थावर/जंगम मालमत्ता, इतर चिज वस्तू इ. आदींचा ताबा देणेचा आहे व तशा जरूर त्या नोंदी लेखी सहयानिशी करणेच्या आहेत.

ब) संस्थेच्या नोंदणी कार्यालयाकडे संस्थेचे नवीन कार्यकारी मंडळ अस्तित्वांत आले तर तसा बदल अहवाल (चेंज-रिपोर्ट, अर्ज, ठराव इ.) सादर करून न्यास नोंदणी कार्यालयाकडे नवीन कार्यकारी मंडळ पदाधिकारी व सदस्य यांच्या नांवाची नोंद करावी लागते. त्याबाबतची जरूर ती पुर्तता अध्यक्षांनी विना विलंब करणेची आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | खजानीस | उपाध्यक्ष | अध्यक्ष |



Scanned with CamScanner

क) संस्थेच्या नांवावर बँकेतील खात्यावरील रक्कमा काढणेचा अधिकार मावळत्या पदाधिकाऱ्यांनी नुतन पदाधिकाऱ्यांना देणेचा असतो. त्याबाबत लागणाऱ्या कागदपत्रांची पुर्तता वर कलम (अ) मध्ये नमूद केले सभेमध्ये करणेची आहे.

ड) (१) संस्थेचे दैनंदिन कामकाज पहाणे, नोकर वर्गाची नेमणूक करणे,बदली करणे, सेवानिवृत्ती करणे, संस्थेचे देण्याघेण्याचे व्यवहार करणे,नोकर वर्गावर देखरेख ठेवणे व त्या अनुषंगाने येणारी कामे पहाणे.

(२) संस्थेच्या पुढील कार्याची दिशा , अंदाजपत्रक, हिशोब इ. तयार करून वार्षिक सभेपुढे मांडणे व मंजूरी घेणे.

(३) संस्थेचे हिशोब सन १९५० च्या संस्था नोंदणी अधिनियमांच्या तरतूदीप्रमाणे ठेवणे व त्यांचे वार्षिक परिक्षण (ऑडीट) सनदी लेखापालाकडून (चार्टर्ड अकौंटंट) करवून घेवून ठराविक नमुन्यात न्यास नोंदणी कार्यालय यांचेकडे ठराविक मुदतीत पाठविणे.

(४) संस्थेने नेमलेल्या व्यक्तीसंबंधी माहिती किंवा विवरणे सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमांतील कलम ४(अ) व १९७१ च्या नियमांतील तरतुदीनुसार नियम क्र.८ अन्वये अनुसूची २ मधील नमुन्यात न्यास नोंदणी कार्यालयाकडे पाठविण्यात येईल. अनुसूची २ चा नमुना या नियम व नियमांवलीसोबत जोडला आहे.

(५) संस्थेचे अंतर्गत हिशोब, हिशोब तपासणीसांकडून तपासून घेवून जमाखर्च,ताळेबंदपत्रक, अहवाल इ. तयार करून वार्षिक सभेपूढे मांडणे.

(६) इतर अनुषंगीक कामे नियमांनुसार चालविणे.

१८) <u>कर्ज किंवा ठेवी यासंबंधी तरतुद</u> :-

संस्थेस आवश्यक वाटल्यास बँक, वित्त संस्था यांचेमार्फत कर्ज घेता येईल व त्यांचा विनियोग संस्थेच्या ध्येय व धोरणासाठीच करता येईल. सदर कर्ज घेताना मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम सन १९५० चे तरतुदीनुसार पालन केले जाईल.

१९) <u>संस्थेचा निधी, मिळकत व विनियोग</u> :-

अ) <u>संस्थेची मिळकत</u> :- संस्थेच्या मालकीची स्थावर मिळकत नाही. भावी काळात संस्थेस उपलब्ध झालेस त्यावर तसेच जंगम मालमत्ता पैसा,साहित्य इ.वर संस्थेची मालकी राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | खजानीस | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

....१०/-

Scanned with CamScanner

ब) <u>निधी</u> :-संस्थेसाठी निधी खालील मार्गांनी उपलब्ध केला जाईल.
१) देणग्या स्वीकारणे, २) सभासद वर्गणी व प्रवेश फी, ३) कायमपरत्वे कर्ज उभारणे, ४) संस्थेसाठी स्थावर/जंगम स्वरूपातील देणग्या मिळवणे, ५) गंगाजळी (राखीव निधी), ६) इमारत निधी, ७) इतर निधी.

क) <u>निधीचा विनियोग</u> :-

१) संस्थेस मिळालेल्या निधीचा विनियोग संस्थेचे उद्देश पार पाडणेसाठी करणेचा आहे.

२) संस्थेचे पैसे संस्थेने ठरवून दिलेल्या मान्यताप्राप्त बँकेतच ठेवणेचे आहेत. कोणत्याही परिस्थितीत कोणाही खाजगी व्यक्तीकडे अगर संस्थेकडे ठेवणेचे नाहीत अगर गुंतविणेचे नाही.

२०) <u>उद्दीष्ट निहाय खर्चाची तरतुद (टक्केवारीप्रमाणे)</u> :-

(१) वरील क्र. १९ मध्ये नमूद केलेप्रमाणे संस्थेकडे जमा होणाऱ्या रक्कमेतून कर्जे व ठेवींची रक्कम वजा जाता राहिलेल्या रक्कमेतून दहा टक्के दरसाल गंगाजळी ( रिझर्व्ह फंड )म्हणून बाजूस काढली जाईल.

(२) संस्थेच्या ज्ञापनामध्ये नमूद केले उद्देशावर म्हणजेच उद्देश क्र. १ ते ४ यावर ६० टक्के व इतर राहिलेल्या उद्देशावर ४० टक्के रक्कम खर्च करणेत येईल.

(३) विशिष्ट प्रसंगावरील उद्देशावरील टक्केवारीतील बदल या संस्थेच्या सर्वसाधारण सभेत जसा ठराव होईल त्याप्रमाणे त्या त्या वर्षात करणेचा आहे.

२१) <u>स्थावर मालमत्ता खरेदी वा विक्री करणेबाबतची तरतुद</u> :-

संस्थेस स्थावर मालमत्ता नसलेने विक्री करणेची तदतूद केलेली नाही. संस्थेस यदाकदाचित भावी काळात स्थावर मिळकत खरेदी वा विक्री करणेची झाल्यास असे व्यवहार मा.धर्मादाय सह -आयुक्त, कोल्हापूर विभाग,कोल्हापूर यांचे पूर्वपरवानगीने मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० कलम ३६ नुसार करणेवे आहेत.

२२) <u>बँक खाते व पैशाचे व्यवहार</u> :-

१) संस्थेच्या नांवाने राष्ट्रीयकृत वा मान्यताप्राप्त बँकेत खाते उघडून त्यावरील व्यवहार अध्यक्ष, खजानीस आणि सेक्रेटरी या तिघांपैकी कोणाही दोघांच्या जोडसहिनेच करणेत येईल.

| सेक्रेटरी | खजानीस | उपाध्यक्ष | अध्यक्ष |
|---|---|---|---|



Scanned with CamScanner

२) या नियम व नियमांवलीच्या कलम १७ मध्ये (क) अन्वये कागदपत्रांची पुर्तता करणे.

२३) <u>सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत</u> :-

संस्थेच्या सभासदांची यादी सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमांतील कलम १५ नुसार संस्थेचे जे सभासद असतील अशा सभासदांची/व्यक्तींची यादी सन १९७१ च्या संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियमांतील कलम १५ प्रमाणे अनुसूची ६ चे नमुन्यात पाठविणेत येईल. अनुसूची ६ चा नमूना या नियम व नियमांवलीसोबत जोडला आहे.

२४) <u>संस्थेच्या नांवातील व उद्देशातील बदल करणेबाबतची तरतूद</u> :-

संस्थेचे नांव अथवा उद्देश यांत बदल करावयाचा असेल अथवा दोन किंवा अधिक संस्थांचे विलीनीकरण करावयाचे असल्यास सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमांतील कलम १२ अथवा १२-अ यांतील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणेत येईल.

२५) <u>नियम व नियमांवलीतील बदल करण्याची तरतूद</u> :-

संस्थेच्या कार्यकारिणीने अगर संस्थेच्या एखाद्या सभासदाने संस्थेच्या चालू नियम व नियमांवलीमध्ये दुरूस्ती सुचविली असल्यास तर ती वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या ३/५ (तीन पंचमांश) मताने मंजूर करणेत येईल.

२६) <u>विसर्जन</u> :-

संस्थेचे विसर्जन करावयाचे झालेस सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमांतील कलम १३ वा १४ अन्वयेच्या तरतूदीस अधिन राहून योग्य ती कार्यवाही केली जाईल.

| | | | |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | खजानीस | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

....१२/-

Scanned with CamScanner

## -: दाखला :-

प्रमाणित करणेत येते कीं, - ''स.ब.खाडे महाविद्यालय,कोपार्डे अलूमनी असोसिएशन, ता.करवीर,जि.कोल्हापूर'' या संस्थेच्या नियम व नियमांवलीची ही खरी व प्रमाणित नक्कल आहे.

| अ.नं. | पदाधिका-यांची नांवे व हुद्दा | | सह्या |
|---|---|---|---|
| १) | श्री.विश्वास राऊ पाटील | अध्यक्ष | ---------- |
| २) | श्री.विष्णू ज्ञानू राऊत | उपाध्यक्ष | ---------- |
| ३) | श्री.श्रीकांत हरी पाटील | सेक्रेटरी | ---------- |
| ४) | श्री.इंद्रजित बळीराम शिरगांवकर | खजानीस | ---------- |

स्थळ :-कोपार्डे,ता.करवीर, जिल्हा कोल्हापूर

दिनांक :- २२/०१ /२००३

Scanned with CamScanner

-:: परिशिष्ट - ड : (संम्मती-पत्र) :: -

प्रति,

माननीय सहाय्यक संस्था निबंधकसो।
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

विषय :- "स.ब.खाडे महाविद्यालय,कोपार्डे अलूमनी असोसिएशन, ता.करवीर, जि.कोल्हापूर" ही संस्था नोंदविणेबाबत.

महोदय,

आम्ही खालील सहया करणार :- "स.ब.खाडे महाविद्यालय,कोपार्डे अलूमनी असोसिएशन, ता.करवीर,जि.कोल्हापूर"या संस्थेच्या पहिल्या कार्यकारी मंडळाचे समासद असून सदरच्या कार्यकारी मंडळावर संस्थेच्या ध्येय, उद्देश व नियमांवली प्रमाणे काम करण्यास आमची संमती आहे. तसेच संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये सदर संस्था नोंदणी होण्यास आमची संमती असून त्याचे प्रतिक म्हणून आम्ही आमच्या स्वाक्षऱ्या या संम्मतीपत्रावर केल्या आहेत.

| अ.नं. | सदस्यांचे संपूर्ण नांव | सहया |
|---|---|---|
| १) | श्री.विश्वास राऊ पाटील | [signature] |
| २) | श्री.विष्णू ज्ञानू राऊत | [signature] |
| ३) | श्री.श्रीकांत हरी पाटील | [signature] |
| ४) | श्री.इंद्रजित बळीराम शिरगांवकर | [signature] |
| ५) | श्री.युवराज उर्फ संदिप मोहन पाटील | [signature] |
| ६) | श्री.बाबासाहेब बाळू पोवाळकर | [signature] |
| ७) | श्री.निशिकांत पांडूरंग खाडे | [signature] |
| ८) | प्रा.कु.विद्या श्रीपती पाटील | [signature] |
| ९) | कु.सविता श्रीपती भास्कर | [signature] |

स्थळ :-कोपार्डे,ता.करवीर,जि.कोल्हापूर                    दिनांक :-२/१० /२००३

वरील सहया करणाऱ्या सर्व व्यक्तींना मी ओळखतो. त्यांनी माझ्या समक्ष वरील विधानपत्रावर सहया केल्या आहेत. ता.२२/१०/२००३

JOHN S. PHUTELO
B.S., L.L.B. (Spel.)
ADVOCATE
KOLHAPUR.

शिक्का
(वकील/संदी लेखापाल/नोटरी)

सही :-
नांव :-
पत्ता :-

Scanned with CamScanner

1002

-:: परिशिष्ट – ड : (संम्मती-पत्र) :: -

प्रति,

माननीय सहाय्यक संस्था निबंधकसो
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

विषय :- "स.ब.खाडे महाविद्यालय,कोपार्डे अलूमनी असोसिएशन, ता.करवीर, जि.कोल्हापूर" ही संस्था नोंदविणेबाबत.

महोदय,

आम्ही खालील सहया करणार :- "स.ब.खाडे महाविद्यालय,कोपार्डे अलूमनी असोसिएशन, ता.करवीर,जि.कोल्हापूर"या संस्थेच्या पहिल्या कार्यकारी मंडळाचे सभासद असून सदरच्या कार्यकारी मंडळावर संस्थेच्या ध्येय, उद्देश व नियमांवली प्रमाणे काम करण्यास आमची संमती आहे. तसेच संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये सदर संस्था नोंदणी होण्यास आमची संमती असून त्याचे प्रतिक म्हणून आम्ही आमच्या स्वाक्षऱ्या या संम्मतीपत्रावर केल्या आहेत.

| अ.नं. | सदस्यांचे संपूर्ण नांव | सहया |
|---|---|---|
| १) | श्री.विश्वास राऊ पाटील | [signature] |
| २) | श्री.विष्णू ज्ञानू राऊत | [signature] |
| ३) | श्री.श्रीकांत हरी पाटील | [signature] |
| ४) | श्री.इंद्रजित बळीराम शिरगांवकर | [signature] |
| ५) | श्री.युवराज उर्फ संदिप मोहन पाटील | [signature] |
| ६) | श्री.बाबासाहेब बाळू पोवाळकर | [signature] |
| ७) | श्री.निशिकांत पांडूरंग खाडे | [signature] |
| ८) | प्रा.कु.विद्या श्रीपती पाटील | [signature] |
| ९) | कु.सविता श्रीपती भास्कर | [signature] |

स्थळ :-कोपार्डे,ता.करवीर,जि.कोल्हापूर

दिनांक :-२२/१० /२००३

वरील सहया करणाऱ्या सर्व व्यक्तींना मी ओळखतो. त्यांनी माझ्या समक्ष वरील विधानपत्रावर सहया केल्या आहेत. ता. २२/१०/२००३

सही :-

नांव :-

पत्ता :-

सिक्का

(वकील/सनदी लेखापाल/नोटरी)

JOHN S. CHUTELO
B.S., LL.B. (Spcl.)
ADVOCATE
KOLHAPUR.

Scanned with CamScanner

1005

–:: परिशिष्ट – ई ::–

प्रति,

माननीय सहाय्यक संस्था निबंधकसो
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

महोदय,

आम्ही खालील सहया करणारे :– "स.ब.खाडे महाविद्यालय,कोपार्डे अलूमनी असोसिएशन, ता.करवीर,जि.कोल्हापूर"या संस्थेच्या पहिल्या कार्यकारी मंडळाचे सभासद नमुद करीत आहोत कीं, या संस्थेच्या वतीने श्री.विश्वास राऊ पाटील,अध्यक्ष – यांना सदरहू संस्थेचे नोंदणीबाबतचे कागदपत्रांत आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार या पत्राने प्रदान करीत आहोत.

| अ.नं. | सभासदांची नांवे (अर्जदाराशिवाय) | सहया |
|---|---|---|
| १) | श्री.विष्णू ज्ञानू राऊत | [signature] |
| २) | श्री.श्रीकांत हरी पाटील | [signature] |
| ३) | श्री.इंद्रजित बळीराम शिरगांवकर | [signature] |
| ४) | श्री.युवराज उर्फ संदिप मोहन पाटील | [signature] |
| ५) | श्री.बाबासाहेब बाळू पोवाळकर | [signature] |
| ६) | श्री.निशिकांत पांडूरंग खाडे | [signature] |
| ७) | प्रा.कु.विद्या श्रीपती पाटील | [signature] |
| ८) | कु.सविता श्रीपती भास्कर | [signature] |

स्थळ :–कोपार्डे,ता.करवीर,जि.कोल्हापूर   दिनांक :२२/१० /२००३

वरील अधिकारपत्र स्विकारले,

अधिकार ग्रहन करणाऱ्या
सभासदाची सही :– [signature]
व ता.२२/१०/२००३
अध्यक्ष

Scanned with CamScanner

-:: परिशिष्ट - ई ::-

प्रति,

माननीय सहाय्यक संस्था निबंधकसो
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

महोदय,

आम्ही खालील सहया करणारे :- ''स.ब.खाडे महाविद्यालय,कोपार्डे अलूमनी असोसिएशन, ता.करवीर,जि.कोल्हापूर''या संस्थेच्या पहिल्या कार्यकारी मंडळाचे सभासद नमुद करीत आहोत कीं, या संस्थेच्या वतीने श्री.विश्वास राऊ पाटील,अध्यक्ष - यांना सदरहू संस्थेचे नोंदणीबाबतचे कागदपत्रांत आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार या पत्राने प्रदान करीत आहोत.

| अ.नं. | सभासदांची नांवे (अर्जदाराशिवाय) | सहया |
|---|---|---|
| १) | श्री.विष्णू ज्ञानू राऊत | [signature] |
| २) | श्री.श्रीकांत हरी पाटील | [signature] |
| ३) | श्री.इंद्रजित बळीराम शिरगांवकर | [signature] |
| ४) | श्री.युवराज उर्फ संदिप मोहन पाटील | [signature] |
| ५) | श्री.बाबासाहेब बाळू पोवाळकर | [signature] |
| ६) | श्री.निशिकांत पांडूरंग खाडे | [signature] |
| ७) | प्रा.कु.विद्या श्रीपती पाटील | [signature] |
| ८) | कु.सविता श्रीपती भास्कर | [signature] |

स्थळ :-कोपार्डे,ता.करवीर,जि.कोल्हापूर दिनांक :२२/१० /२००३

वरील अधिकारपत्र स्विकारले,

अधिकार ग्रहन करणाऱ्या
सभासदाची सही :- [signature]
व ता.२२/१०/२००३ अध्यक्ष

Scanned with CamScanner

-:: संम्मती पत्र ::-

प्रति,

माननीय धर्मादाय उप-आयुक्तसो,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

महोदय

श्री.विश्वास राऊ पाटील,अध्यक्ष -यानी ''स.ब.खाडे महाविद्यालय,कोपार्डे अलूमनी असोसिएशन, ता.करवीर,जि.कोल्हापूर''ही संस्था नोंदविणेसाठी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये दिनांक : २३/१२/२००३ ई. रोजी अर्ज सादर केला आहे. त्या अर्जातील सर्व माहिती खरी आहे. आम्हास त्यासंबंधी जास्त कांही सांगावयाचे नाही. सदरच्या अर्जाची सुनावणीची स्वतंत्र नोटीस आम्हांस काढण्याची कांही आवश्यकता नाही. नोंदणी विषयक प्रमाणपत्र अर्जदारांच्या नांवे देणेस आमची कोणतीही हरकत नाही.

कळावे, आपले....

| अ.नं. | अर्जदाराशिवाय इतर सर्व विश्वस्तांची नांवे | सहया |
|---|---|---|
| १) | श्री.विष्णू ज्ञानू राऊत | |
| २) | श्री.श्रीकांत हरी पाटील | |
| ३) | श्री.इंद्रजित बळीराम शिरगांवकर | |
| ४) | श्री.युवराज उर्फ संदिप मोहन पाटील | |
| ५) | श्री.बाबासाहेब बाळू पोवाळकर | |
| ६) | श्री.निशिकांत पांडूरंग खाडे | |
| ७) | प्रा.कु.विद्या श्रीपती पाटील | |
| ८) | कु.सविता श्रीपती भास्कर | |

वरील सर्व सहया मी ओळखतो.

अर्जदाराची सही :-
अध्यक्ष

Scanned with CamScanner

1011
20 Rs

बीस रुपये

सत्यमेव जयते

भारत

INDIA

२० रु.

20 RS

TWENTY RUPEES

17 OCT 2003

दिनांक अ. नं. 954 स्टँप कि. रु. 20/-

नाव

यांनी

त्यांचे मार्फत अ. ... असे स्टँप दिले

Stamp Head Clerk, Treasury Office Kolhapur

16 SEP 2003

मे. कार्यकारी दंडाधिकारी सो, ता. करवीर, जि. कोल्हापूर

यांचे समोर.

/ प्रतिज्ञा-पत्र /

(परिशिष्ट - फ)

मी, खाली सही करणार : श्री. विश्वास राऊ पाटील, वय व. ३०, व्यवसाय : शिक्षक, रा. कोपार्डे, ता. करवीर, जि. कोल्हापूर. अध्यक्ष " स.ब.खाडे महाविद्यालय, कोपार्डे अलुमनी असोसिएशन, ता. करवीर, जि. कोल्हापूर." आज मुक्काम कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर सांगतो की,

१) मी, -" स.ब.खाडे महाविद्यालय, कोपार्डे अलुमनी असोसिएशन, ता. करवीर, जि. कोल्हापूर." या संस्थेचा सभासद / विश्वस्त असून संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये सदर संस्था नोंदणी करण्यासाठी मा. सहाय्यक संस्था निबंधक, कोल्हापूर यांचे कार्यालयात दि. २३.१२.२००३ इ. रोजी प्रस्ताव दाखल केला आहे. सदर संस्थेच्या ज्ञापनातील नियम व नियमावलीतील तसेच प्रस्तावासोबत जोडलेले इतर कागदपत्रातील मजकूर व विधाने सत्य व खरी आहे. वरील संस्था ही धर्मादाय / धार्मिक स्वरूपाच्या

२/

1012



उद्देशांकरिता स्थापन केली असून तिचे ध्येय व उद्देश संस्था नोंदणी अधिनियम १८६० च्या कलम २० प्रमाणे आहेत.

२] मी असेही सांगतो की,

१] या संस्थेच्या विधानपत्रावर [संस्थापन समयलेख] सह्या करणाऱ्या सर्व सभासदांना मी ओळखतो.

२] आज तारखेपर्यंत नोंदणी प्रकरणातील मजकूरात काहीही बदल झालेला नाही.

३] वरील नांवाची किंवा नामसादृश्य असलेली संस्था / मंडळ माझ्या माहितीप्रमाणे आमचे गांवी सध्या अस्तित्वात वा नोंद झालेली नाही.

४] आज तारखेपर्यंत संस्थेस कोणत्याही प्रकारची स्थावर मालमत्ता नाही. संस्थेजवळ रोख रक्कम रुपये ४००/- आहेत व ती रक्कम माझेकडे संस्थेच्या नांवे जमा आहेत.

५] या संस्थेच्या ज्ञापनांत " संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता" या सदरात दिलेल्या पत्त्याची जागा ही महाविद्यालयाची असून ती वापरणेसाठी आमचेकडे आहे. त्यापृष्ट्यर्थ मी या प्रतिज्ञापत्रासोबत महाविद्यालयाचे पत्र जोडलेले आहे. याबाबत कांही कमी जास्त झाल्यास अथवा कांही वाद निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी माझी तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी यांची राहील. तसेच संस्थेच्या पत्त्यांत कांही बदल झाल्यास तो रितसर कळविणेची जबाबदारी माझी स्वतःची राहील. वरील सर्व माहिती सत्य व बरोबर असून सदर माहिती खोटी ठरल्यास भा.दं.वि. १९३[२] व १९९ व २०० अन्वये दंडास पात्र राहीन म्हणून लिहून दिले सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट.

स्थळ: कोल्हापूर.


दि. २३/१२/२००३.

सही/- Patil

[विश्वास राऊ पाटील]

अध्यक्ष,

" स.ब.खाडे महाविद्यालय, कोपार्डे अलुमनी असोसिएशन, ता. करवीर, जि. कोल्हापूर.


PERMANENT ACCOUNT NUMBER
AFSPP6300D
नाम NAME
VISHWAS RAU PATIL
FATHER'S NAME
RAU BHAU PATIL
DATE OF BIRTH
01-08-1969
हस्ताक्षर SIGNATURE
आयकर आयुक्त, कोल्हापूर
COMMISSIONER OF INCOME TAX, KOLHAPUR

EXECUTIVE MAGISTRATE KARVIR DIST. KOLHAPUR

श्री. ... शिरस्तेदार
तहसिलदार ऑफिस करवीर आवार
कोल्हापूर

30/12/03

23/12/03

-:: संम्मती पत्र ::-

प्रति,

माननीय धर्मादाय उप-आयुक्तसो,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

महोदय

श्री.विश्वास राऊ पाटील,अध्यक्ष -यानी "स.ब.खाडे महाविद्यालय,कोपार्डे अलूमनी असोसिएशन, ता.करवीर,जि.कोल्हापूर"ही संस्था नोंदविणेसाठी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये दिनांक :23/02/२००३ ई. रोजी अर्ज सादर केला आहे. त्या अर्जातील सर्व माहिती खरी आहे. आम्हास त्यासंबंधी जास्त कांही सांगावयाचे नाही. सदरच्या अर्जाची सुनावणीची स्वतंत्र नोटीस आम्हांस काढण्याची कांही आवश्यकता नाही. नोंदणी विषयक प्रमाणपत्र अर्जदारांच्या नांवे देणेस आमची कोणतीही हरकत नाही.

कळावे,

आपले....

| अ.नं. | अर्जदाराशिवाय इतर सर्व विश्वस्तांची नांवे | सहया |
|---|---|---|
| १) | श्री.विष्णू ज्ञानू राऊत | |
| २) | श्री.श्रीकांत हरी पाटील | |
| ३) | श्री.इंद्रजित बळीराम शिरगांवकर | |
| ४) | श्री.युवराज उर्फ संदिप मोहन पाटील | |
| ५) | श्री.बाबासाहेब बाळू पोवाळकर | |
| ६) | श्री.निशिकांत पांडूरंग खाडे | |
| ७) | प्रा.कु विद्या श्रीपती पाटील | |
| ८) | कु.सविता श्रीपती भास्कर | |

वरील सर्व सहया मी ओळखतो.

अर्जदाराची सही :-

अध्यक्ष

Scanned with CamScanner

1015

-: संम्मती पत्र :-

संम्मतीपत्र लिहून देणार :श्री. मारुतीराव हरी सुर्यवंशी

वय वर्षे : ६५ व्यवसाय : प्राचार्य राहणार : कोपार्डे ता. करवीर, जि. कोल्हापूर.

संम्मतीपत्र लिहून देतो की,

जागा/इमारत ) गांवाचे नांव : कोपार्डे

वर्णन ) सि.स.नं./रि.स.नं : वॉर्ड :

) तालुका : करवीर

) जिल्हा : कोल्हापूर.

ही जागा / इमारत माझे नांवे, आमचे कबजे वहिवाटीतील अशी असून या मिळकतीमध्ये (संस्थेचे/मंडळाचे नांव) "स. ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे अलुमनी असोसिएशन, ता. करवीर, जि. कोल्हापूर."

या संस्थेच्या कार्यालयाचा / पत्रव्यवहाराचा पत्ता या संस्थेच्या नोंदणीकामी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयामध्ये दाखल करणेत येणाऱ्या संस्थेच्या प्रस्तावामध्ये नमूद करणेस माझी कसल्याही प्रकारची तक्रार / हरकत नाही. या गोष्टीस माझी पूर्ण संम्मती आहे. म्हणून लिहून दिले हे संम्मतीपत्र राजीखुषीने, अक्कलहुषारीने.

ठिकाण : कोपार्डे

तालुका : करवीर

सही : [signature]

PRINCIPAL,
S. B. Khade Mahavidyalaya,
Koparde

संपूर्ण नांव :
(जागा / इमारत मालकाचे नांव)

दिनांक :- 22/10/2003

Scanned with CamScanner

1017

## अनुसूची - १ (एक) (नियम ७ पहा)

संस्थेचे नांव व पत्ता :-

संस्था नोंदणी अधिनियम
१८६० अन्वये नोंदणी क्रमांक :-

निवडणूकीची तारीख व ज्या
कालावधीसाठी निवडण्यांत
आले असेल तो कालावधी :-

ज्या कालावधीसाठी यादी
करण्यांत आली असेल तो
कालावधी :-

| अ.क्र. (१) | नांव (२) | पत्ता (३) | व्यवसाय (४) | वय (५) | हुद्दा (६) | शेरा (७) |
|---|---|---|---|---|---|---|

सेक्रेटरी खजिनदार अध्यक्ष

उपाध्यक्ष

Scanned with CamScanner

## अनुसूची – २ (नियम ८ पहा)

३१ डिसेंबर २०० रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कालावधीत संस्थेने नियुक्त केलेल्या व्यक्ती, त्यांच्या नोकरीबाबत शर्ती वगैरेबाबतचे विवरणापत्र

संस्थेचे नांव व पत्ता :-

संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी क्रमांक :-

| अ.नं. | कर्मचाऱ्याचे नांव | विद्यमान वेतनश्रेणी | अस्थाई की, स्थाई व पुर्णकालीक की, अंशकालीक | विद्यमान मासिक वेतन | दरमहा महागाई भत्ता असल्यास | विशेष वेतन कोणतेही भाडे ,वैध्यकीय वाहन वगैरे | अन्य भत्ते कोणतेही असल्यास | भविष्य निर्वाह निधीचा कोणताही लाभ असल्यास | संस्थेने पुरविलेल्या सोई व इतर सोयी कोणत्याही असल्यास | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |

-:: अनुसूची - ६ ::- (नियम १५ पहा)

संस्थेचे नांव व पत्ता :-

संस्था नोंदणी अधिनियम :-

१८६० अन्वये नोंदणी क्रमांक

| अ.क्र. | सदस्याचे संपूर्ण नांव व पत्ता | प्रवेशाची तारीख | सदस्याची सही |
|---|---|---|---|
| १) | | | |
| २) | | | |
| ३) | | | |
| ४) | | | |
| ५) | | | |
| ६) | | | |
| ७) | | | |
| ८) | | | |
| ९) | | | |
| १०) | | | |
| ११) | | | |
| १२) | | | |
| १३) | | | |
| १४) | | | |
| १५) | | | |

सेक्रेटरी खजानीस उपाध्यक्ष अध्यक्ष

Scanned with CamScanner

## अनुसूची - १ (एक) (नियम ७ पहा)

संस्थेचे नांव व पत्ता :-

संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी क्रमांक :-

निवडणूकीची तारीख व ज्या कालावधीसाठी निवडण्यांत आले असेल तो कालावधी :-

ज्या कालावधीसाठी यादी करण्यांत आली असेल तो कालावधी :-

| अ.क्र. (१) | नांव (२) | पत्ता (३) | व्यवसाय (४) | वय (५) | हुद्दा (६) | शेरा (७) |
|---|---|---|---|---|---|---|

सेक्रेटरी

खजानीस

अध्यक्ष

उपाध्यक्ष

## अनुसूची – २ (नियम ८ पहा)

३१ डिसेंबर २०० रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कालावधीत संस्थेने नियुक्त केलेल्या व्यक्ती, त्यांच्या नोकरीबाबत शर्ती वगैरेबाबतचे विवरणपत्र

संस्थेचे नांव व पत्ता :-

संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी क्रमांक :-

| अ.नं. | कर्मचाऱ्याचे नांव | विद्यमान वेतनश्रेणी | अस्थाई कीं, स्थाई व पुर्णकालीक कीं, अंशकालीक | विद्यमान मासिक वेतन | दरमहा महागाई भत्ता असल्यास | विशेष वेतन कोणतेही भाडे, वैध्यकीय वाहन वगैरे | अन्य भत्ते कोणतेही असल्यास | भविष्य निर्वाह निधीचा कोणताही लाभ असल्यास | संस्थेने पुरविलेल्या सोई व इतर सोयी कोणत्याही असल्यास | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |

२१/१/२०१२.

१०५

1025

-:: अनुसूची - ६ ::- (नियम १५ पहा)

संस्थेचे नांव व पत्ता :-

संस्था नोंदणी अधिनियम :-

१८६० अन्वये नोंदणी क्रमांक

| अ.क्र. | सदस्याचे संपूर्ण नांव व पत्ता | प्रवेशाची तारीख | सदस्याची सही |
|---|---|---|---|
| १) | | | |
| २) | | | |
| ३) | | | |
| ४) | | | |
| ५) | | | |
| ६) | | | |
| ७) | | | |
| ८) | | | |
| ९) | | | |
| १०) | | | |
| ११) | | | |
| १२) | | | |
| १३) | | | |
| १४) | | | |
| १५) | | | |

सेक्रेटरी खजानीस उपाध्यक्ष अध्यक्ष

Scanned with CamScanner